दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा
गुरुवार, दि. २७ नोव्हेंबर २०२५

# निशा मिटके झाली महसूल सहाय्यक



**जोतिबा** : भाविकांचे कुलाचार विधी पुजा आर्चा करीत पुजाऱ्यांच्या मुलीने यश मिळवले आहे. निशा सुनिल मिटके हीने जोतिबा डोंगर येथील प्राथमिक शाळेत शिक्षण घेऊन माध्यमिक शिक्षणासाठी माले येथील ज्योतिर्लिंग हायस्कुल मध्ये शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर स्वामी विवेकानंद कॉलेज मध्ये बी.एससी पुर्ण करून एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण झाली. तिची महसुल सहाय्यक पदी निवड झाली. या यशाने तिच्या आई-वडिलांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले.